**न्यू एज्युकेशन सोसायटी, लांजा संचलित**

# कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, लांजा

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## ***अहवाल 2024 – 25***

कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय लांजाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने शैक्षणिक वर्ष 2024-25 यावर्षी विविध प्रकल्प हाती घेण्यात आले त्याचा संक्षिप्त अहवाल पुढील प्रमाणे,

१. **आंतरराष्ट्रीय योग दिवस : २१ जून २०२४**










२. **वृक्षारोपण** : वाटुळ - व्हेळ मार्गावर वृक्षारोपण ८ आणि ९ ऑगस्ट २०२४





**३. ग्रंथ संकलन (संकलित ग्रंथांचे वाटप) :**




४. **स्वच्छता ही सेवा** – केंद्र शासनाच्या **स्वच्छता ही सेवा** या संकल्पनेला अनुसरून महाराष्ट्र शासनाने स्वच्छता ही सेवा हा प्रकल्प राबवत असताना प्रत्येक विद्यापीठांतर्गत काही निवडक महाविद्यालयांची निवड करून त्यांना **17 ऑगस्ट ते 2 ऑक्टोबर** या कालावधीमध्ये विविध उपक्रम राबविण्याचे निर्देश आणि शेड्यूल दिले होते. त्यानुसार मुंबई विद्यापीठ अंतर्गत रत्नागिरी जिल्ह्यामधील पाच निवडक महाविद्यालयांमध्ये आपल्या महाविद्यालयाची निवड झाली होती. या उपक्रमाला 25 हजार रुपये अनुदानही प्राप्त झालेले आहे. या उपक्रमांतर्गत महाविद्यालय ते गोसावी वाडी स्टॉप इथपर्यंत रस्त्याच्या दुतर्फा पडलेले प्लास्टिक गोळा करत या स्वच्छता अभियानाची सुरुवात झाली. एक पेड माँ के नाम या उपक्रमांतर्गत कुवे येथील अमृत वाटिका मध्ये 50 वृक्षांची लागवड करण्यात आली. 24 सप्टेंबर रोजी महाविद्यालय ते महिलाश्रम मार्गे पंचायत समिती तहसीलदार कार्यालय येथे पर्यंत स्वच्छता जनजागृती फेरीचे आयोजन करण्यात आले होते, या फेरीमध्ये विद्यार्थ्यांनी पथनाट्य देखील केले आणि तहसीलदार कार्यालय येथे स्वच्छतेची शपथ घेण्यात आली. या उपक्रमाला पंचायत समिती, तहसीलदार कार्यालय आणि नगरपंचायतीचे सहकार्य लाभले. या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील वर्ग खोल्यांची स्वच्छता राखणे, महाविद्यालय परिसर स्वच्छता, नक्षत्र गार्डन स्वच्छ करणे, तसेच महाविद्यालयातील स्वच्छता कर्मचारी यांचा सन्मान, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रोफेसर डॉक्टर सुनील चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला.

















वक्तृत्व स्पर्धा — वृक्षारोपण

५. **सायबर क्राईम-** महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने सायबर क्राईम आणि सुरक्षा या विषयावरील 30 तासांचा शॉर्ट टर्म कोर्स आयोजित करण्यात आला होता. या कोर्समध्ये संगणक हाताळणी आणि सायबर गुन्हे याविषयीचे माहिती देऊन, विद्यार्थ्यांना प्रत्येक गुन्ह्या संदर्भातील विविध व्हिडिओ एकत्र करून, त्याचे सादरीकरण करून, गुन्हेगाराची प्रवृत्ती आणि मानसिकता नेमकी काय असते, अशा स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये तपास यंत्रणांची भूमिका काय असते आणि सायबर सिक्युरिटीमध्ये असणारे वैधानिक प्राविधान याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. प्रा. अनुप सरदेसाई, प्रा. सिद्धेश खवळे, प्रा. अवंतिका केळुसकर, प्रा. राकेश सुर्वे तसेच विद्यार्थी हुजेफ खान यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन दिले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी रुणमधील ग्रामस्थ, लांजा महाविद्यालयमधील विद्यार्थांना सायबर क्राईमची माहिती देऊन, तो गुन्हा घडण्यापासून आपण कसे वाचू शकतो याविषयी जागृती केली. त्याचप्रमाणे हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

६. **महिला सुरक्षा पथनाट्य :**







न्यू इंग्लिश स्कूल, लांजा

११ ऑक्टोबर २०२४




उर्दू हायस्कूल, लांजा

८ जानेवारी २०२५



७. **व्यक्तिमत्व विकास कौशल्य -** सध्याच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांच्या कौशल्य वृद्धीची अत्यावश्यकता दिसून येते. 28 डिसेंबर ते 5 जानेवारी या कालावधीमध्ये कोचरी येथील सात दिवसीय निवासी शिबिरांमधील सहभागी झालेल्या 83 विद्यार्थ्यांना संपूर्ण कालावधीमध्ये त्यांच्या विविध कौशल्यांचा विकास व्हावा याकरिता व्यक्तिमत्व विकास कौशल्य या शॉर्ट टर्म कोर्स चे आयोजन देखील करण्यात आले होते. यामध्ये गोल सेटिंग, मोटिवेशन, टीम बिल्डिंग, सामाजिक जाणीवांचा विकास, आत्मविश्वास: विकासाची गुरुकिल्ली आणि अभिनय, कल्पना विकास, नाटक समजून घेताना, कौटुंबिक हिंसाचार आणि मूल्य संवर्धन: श्रमसंस्कार, योग प्रशिक्षण, ध्यानधारणा, प्रार्थना, तसेच इव्हेंट मॅनेजमेंट इत्यादी विविध विषयांवरील कार्यशाळा, कृती कार्यक्रम, ग्रुप डिस्कशन, प्रेसेंटेशन घेण्यात आले आणि श्रमसंस्कार पासून ते नेतृत्व गुण विकासापर्यंत सर्व मूल्य संवर्धनाचा

विकास करण्याचा प्रयत्न केला गेला. श्री. संतोष मेकले, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, पणदूर येथील संविता आश्रमचे संस्थापक श्री. संदीप परब, गोगटे जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरी येथील सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. आनंद आंबेकर, डॉ. समीर घोरपडे, ॲड. अभिजीत अभ्यंकर, हेरिटेज कल्चर संस्था संस्थापक श्री. संतोष कांबळे, डॉ.राहुल मराठे यांचे मार्दर्शन लाभले.










८. **एड्स जनजागृती आणि आरोग्य** - या उपक्रमांतर्गत यावर्षी 13 जानेवारी रोजी नाणीज येथील नरेंद्राचार्य संस्थान, पटेल पाटीदार समाज, माजी विद्यार्थी संघटना आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पूर्ण दिवसभर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कोल्हापूर येथील महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त संजीवन रक्तपेढी या रक्तपेढीला रक्तदान करण्यात आले, यावेळी 143 युनिट इतके रक्त संकलित झाले होते. एड्स जाजागृती उपक्रमा अंतर्गत प्रत्यक्ष HIV बाधित व्यक्तीशी मुलाखत होऊन त्याचे अनुभव ऐकण्याची संधी मिळाली. रेड रिबन क्लबच्या विविध ॲक्टिव्हिटी अंतर्गत १ डिसेंबर ते ७ डिसेंबर : एड्स जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. यामध्ये १ डिसेंबर रोजी लांजा शहरांमध्ये दोन पथनाट्य सादर करण्यात आली. आणि जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी नऊ पोस्टर्स पाठवण्यात आले. रेड रिबन क्लबची महाविद्यालायामध्ये स्थापना करण्यात आली, त्यात मीत शेट्ये याने सेक्रेटरी म्हणून काम पाहिले.

 

९. **नेतृत्व प्रशिक्षण शिबिर** - वरील सर्व उपक्रमांबरोबरच महाविद्यालयाने रत्नागिरी जिल्ह्याच्या नेतृत्व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले होते. यावर्षी इंजीनियरिंग महाविद्यालयांच्या परीक्षांमुळे त्यांचा सहभाग वगळता, या शिबिराचा 70 विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. या शिबिरामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास करत असताना, गोल सेटिंग, टाईम मॅनेजमेंट, कम्युनिकेशन स्किल, स्ट्रेस मॅनेजमेंट, इव्हेंट मॅनेजमेंट, अत्माविश्वास वृद्धी, रिपोर्ट रायटिंग, वर्षभरातील विविध उपक्रम, शिबिराचे नियोजन करत असताना घ्यावयाची काळजी, दत्तक गावात कशा पद्धतीने उपक्रम राबविले जावेत, दत्तक गावाची निवड कशी करावी? टीम बिल्डींग, हे उपक्रम पार पाडत असताना अकाउंट कसे ठेवावे? वर्षभरातील विविध शिबिरांमध्ये विद्यार्थ्यांचे सहभाग होण्याकरिता स्वयंसेवक बँक किती उपयोगाला येते? या गोष्टीचे महत्त्व विविध तज्ज्ञ

मार्गदर्शकांच्यावतीने व्यक्त करण्यात आले. शिबिराच्या समारोप समारंभा प्रसंगी रत्नागिरी जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी माननीय कीर्तीकिरण पुजार सर यांचे मार्गदर्शन लाभल







उद्घाटन : मा.नीलकंठ बगळे,पी.आय. लांजा. समारोप : मा. कीर्तीकिरण पूजार ( IAS ) CEO ZP RAT.

१०. **ग्रामीण पुनर्रचना शिबिर** - 28 डिसेंबर 2024 ते 3 जानेवारी 2025 या कालावधीमध्ये कोचरी येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष ग्रामीण पुनर्रचना शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराच्या अंतर्गत व्यक्तिमत्व विकास कौशल्य या लघुकालीन कौशल्य विकास कोर्स, विविध कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच सकाळी आणि संध्याकाळी योगासनांचे प्रात्यक्षिक आणि ध्यानधारणा या कौशल्यांचे प्रात्यक्षिक करून घेण्यात आले. श्रमदानाच्या सत्रांमध्ये पाच वनराई बंधारे, सार्वजनिक परिसर स्वच्छता यामध्ये कोचरी माध्यमिक विद्यालय परिसरात वाफे तयार करणे, जमीन लेवल करणे, आणि परिसर स्वच्छता, गावाचे ग्रामदैवत गांगेश्वर मंदिर परिसर स्वच्छता, गुरववाडी येथील दत्त मंदिर आणि ग्रामपंचायत परिसर स्वच्छता, बौद्धवाडी येथील बुद्ध विहार परिसर स्वच्छता, सालपे येथील धावबा मंदिर परिसर स्वच्छता, याचबरोबर नदी स्वच्छता मोहीम देखील हाती घेण्यात आली होती. महिला आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन देखील 2 जानेवारी रोजी करण्यात आले होते. या शिबिरासाठी आयुषमान हॉस्पिटल लांजा येथील डॉ. प्रीती कुलकर्णी, डॉ. प्राजक्ता कामत, डॉ. स्नेहल कुलकर्णी, शिपोशी येथील उपकेंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. ढोणे, उपस्थित होते. महिला आरोग्य तपासणी शिबिरामध्ये हिमोग्लोबिन चाचणी आणि हाडांमधील कॅल्शियमचे प्रमाण चाचणी या सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. एकूण 84 महिलांनी महिला आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेतला. 66 महिलांची हिमोग्लोबिन चाचणी करण्यात आली. 45 रुग्णांनी हाडांमधील कॅल्शियमच्या प्रमाणाची तपासणी करून घेतली. नेत्र आरोग्य तपासणीचा 161 रुग्णांनी लाभ घेतला. मोफत औषधे उपलब्ध करून देताना, शिपोशी प्राथमिक आरोग्य केंद्राचे अत्यंत मोलाचे योगदान लाभले. शिबिराच्या समारोपाला लांजा-राजापूर मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार माननीय श्री. किरणजी सामंत यांची प्रमुख उपस्थिती लाभली. राष्ट्रीय सेवा योजनेचे नेमके स्वरूप जाणून घेताना शिबिर कालावधीमध्ये समाजोपयोगी कामे कोणती आणि कशी केली जातात, हे समजून घेताना महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे नियमित उपक्रम आणि विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून गाव खेड्यातील लोकांसाठी केलेल्या विविध प्रयत्नांचे कौतुक केले. हे शिबिर यशस्वीपणे संपन्न करण्यासाठी, कोचरी ग्रामपंचायतच्या सरपंच सौ. आकांक्षा

गुरव, तंटामुक्ती अध्यक्ष श्री. वसंत बेंद्रे, पोलीस पाटील श्री. प्रकाश बेंद्रे, सामाजिक कार्यकर्ते श्री. लहू धावडे, श्री. नंदकुमार बने, श्री. परशुराम गुरव, श्री. संदेश कांबळे, तसेच ग्रामपंचायतीचे सर्व सन्माननीय सदस्य, बेंद्रेवाडी येथील जि. प. पू. प्राथमिक शाळा नं. 1 चे मुख्याध्यापक श्री. जाधव सर, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. बिजम सर, न्यू एज्युकेशन सोसायटी, लांजाचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, उपप्राचार्य, सर्व प्राध्यापक वर्ग आणि प्राध्यापकेतर कर्मचारी, रा. से. यो. विभागाचे सर्व सदस्य, आजी-माजी स्वयंसेवक या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.


















उद्घाटन : मा.दत्ताजी कदम साहेब

मा.प्र.प्राचार्य प्रो.डॉ.सुनिल चव्हाण




**समारोप समारंभ : मा.आमदार श्री.किरणजी सामंत**

११. **द्वि-दिवसीय विशेष निवासी शिबिर -** मुंबई विद्यापीठाचे माजी रजिस्ट्रार कै. काका सरफरे यांचे सुपुत्र मुंबई येथील सुप्रसिद्ध उद्योजक श्री. सुबोध सरफरे यांना महाविद्यालयातील एनएसएस विभागाच्या उपक्रमाबद्दल विशेष उत्सुकता असते. त्यांच्या विनंतीनुसार बोरथडे येथील त्यांच्या गावामध्ये **३१ जानेवारी आणि १ फेब्रुवारी २०२५** या कालावधीमध्ये दोन दिवसीय निवासी शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराच्या आयोजनाचा मुख्य उद्देश पाण्याच्या समस्येवरील उपाय म्हणून बंधारे बांधणे आणि प्लास्टिक मुक्ती संदर्भातील जनजागृती हा होता. या शिबिरामध्ये १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ४ बंधारे, सार्वजनिक परिसर स्वच्छता, रॅली, या उपक्रमा अंतर्गत ग्रामस्थांशी सुसंवाद करताना गावातील यशस्वी बनलेल्या व्यक्तींचा प्रेरणादायी प्रवास देखील उलगडला, हे शिबिर खूप सकस, मंथन करणारे आणि विद्यार्थ्यांच्या भावी जीवनामध्ये बऱ्याच सकारात्मक गोष्टी देणारे म्हणून उल्लेखनीय ठरले.





१२. **मतदार जागृती -** विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि राष्ट्रीय छात्र सेना विभागातील एकूण 26 विद्यार्थ्यांनी लांजा पोलीस स्टेशन सोबत लांजा शहरातील विविध बुथवर आणि तालुक्यातील विविध बीटमध्ये भरारी पथकांमध्ये विशेष पोलीस अधिकारी म्हणून काम पाहिले. डॉ.राहुल मराठे आणि क्रीडा विभागाचे प्रा. शशांक उपशेट्ये यांची २६७ लांजा-राजापूर मतदार संघासाठी विधानसभा निवडणूक प्रचार-प्रसारासाठी युथ आयकोन म्हणून निवड करण्यात आली होती. स्वीप उपक्रमां अंतर्गत शिक्षण अधिकारी मा. विनोद सावंग यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून मतदान करण्याची शपथ देवविली.






१३. **अन्य उपक्रमातील सहभाग** - हर घर तिरंगा अभियान, रा.से.यो पब्लिसिटी विक, संविधान दिन, महिला सुरक्षा विषयावर लांजा पोलीस स्टेशनच्या वतीने लांजा शहर, लांजा हायस्कूल आणि उर्दू माध्यम शाळा येथे पथनाट्याचे सादरीकरण, विविध उपक्रमांसाठी पंचायत समिती तहसीलदार कार्यालय, तसेच ग्रामपंचायतींना स्वयंसेवक म्हणून सहकार्य केले.







**हर घर तिरंगा रॅली**

१४. **विविध शिबिरातील सहभाग** - महाराष्ट्र शासन आणि संत तुकडोजी महाराज विद्यापीठ अहमदनगर यांनी आयोजीत केलेल्या आव्हान या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिरांमध्ये रत्नागिरी जिल्हयाचे प्रतिनिधित्व करताना कु.रिया जाधव आणि कु. श्रवण विश्वासराव यांनी सहभाग घेतला. विद्यापीठस्तरीय नेतृत्व प्रशिक्षण शिबिरासाठी कु. रिया जाधव आणि कु. आदित्य सुर्वे यांनी सहभाग घेतला. कु. रेहान नेवरेकर याची प्री एन.आर.डी. परेड पूर्व चाचणीसाठी विद्यापीठ स्तरावर निवड झाली होती. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील, राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी विद्यापीठ संघामध्ये रेहान नेवरेकर याची निवड झाली. विकसित भारत युथ पार्लमेंटच्या जिल्हास्तरीय निवड चाचणी साठी ५१ विद्यार्थ्यांनी सहबग घेतला त्या मधील 21 विद्यार्थांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.


University of Mumbai
National Service Scheme
&
Arts, Commerce and Science College, Lanja
organized
Leadership Training Programme (Ratnagiri District)
Certificate of Participation

This is to certify that
Mr./Ms. Riya Milind Jadhav of ACS College, Lanja
has participated in Leadership Training Programme for NSS Volunteers organized at
Late. Rama Narayan Shetye Trust, Janaki Niwas, Tal. Lanja from 29th November 2024 to 3rd December 2024.

Dr. Rahul M. Marathe, NSS Dist. Coordinator, Ratnagiri District
Prof. Sushil R. Shinde, OSD NSS Cell, University of Mumbai
Prof. Dr. Sunil M. Chavan, I/C Principal, ACS College, Lanja


सत्यमेव जयते
भारत सरकार/ Government of India
युवा कार्यक्रम एवं खेल मंत्रालय
Ministry of Youth Affairs & Sports
राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय निदेशालय, पुणे/Regional Directorate of NSS, Pune
प्रमाणपत्र/Certificate
प्रमाणित किया जाता है कि/ Certified that
श्री./कुमारी/डॉ./ Mr. /Ms. /Dr. Rehan Naushad Nevarekar
सुपुत्र/सुपुत्री/श्री./Son / Daughter of Shri Naushad A.Rehman Nevarekar
रा.से. यो. स्वयंसेवक/कार्यक्रम अधिकारी/ N.S.S. Volunteer / Programme Officer of New Education Society Arts, Commerce and Science College, Lanja, University of Mumbai
ने १६ – २२ फरवरी, २०२५ तक भारत सरकार, युवा कार्यक्रम एवं खेल मंत्रालय द्वारा प्रायोजित एवं राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय निदेशालय, पुणे द्वारा शिवाजी विश्वविद्यालय, कोल्हापूर, महाराष्ट्र में आयोजित राष्ट्रीय एकता शिविर-२०२५ में सहभागिता की।
Participated in the National Integration Camp-2025, sponsored by Government of India, Ministry of Youth Affairs and Sports, organized by Regional Directorate of National Service Scheme, Pune at Shivaji University, Kolhapur, Maharashtra from 16th to 22nd February, 2025.

Dr. T. M. Chougale, Director, NSS, Shivaji University, Kolhapur
Ajay B. Shinde, Regional Director, Regional Directorate of NSS, Pune
Prof. (Dr.) D. T. Shirke

**नेतृत्व प्रशिक्षण शिबिर : कु. रिया जाधव**

**राष्ट्रीय एकात्मता शिबिर : कु. रेहान नेवरेकर**



SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY
NATIONAL SERVICE SCHEME
AVHAN-2024 Chancellor's Brigade | Maharashtra State Inter-University Disaster Preparedness Training Programme

Certificate of Participation

This is to certify that **Mr. Shravan D. Vishwasrao, A. C. S. Collage, Lanja** has actively participated in **Avhan - 2024 Chancellor's Brigade (Maharashtra State Inter-University Disaster Preparedness Training Programme)** held during 07th - 16th November, 2024 organised by Sant Gadge Baba Amravati University, Amravati

Director, National Service Scheme, Sant Gadge Baba Amravati University | State Liaison Officer & OSD, NSS Cell, Dept. of Higher & Technical Education, Govt. of Maharashtra | Vice-Chancellor, Sant Gadge Baba Amravati University



SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY
NATIONAL SERVICE SCHEME
AVHAN-2024 Chancellor's Brigade | Maharashtra State Inter-University Disaster Preparedness Training Programme

Certificate of Participation

This is to certify that **Ms. Riya M. Jadhav, Arts.Commerce& Science College, Lanja** has actively participated in **Avhan - 2024 Chancellor's Brigade (Maharashtra State Inter-University Disaster Preparedness Training Programme)** held during 07th - 16th November, 2024 organised by Sant Gadge Baba Amravati University, Amravati

Director, National Service Scheme, Sant Gadge Baba Amravati University | State Liaison Officer & OSD, NSS Cell, Dept. of Higher & Technical Education, Govt. of Maharashtra | Vice-Chancellor, Sant Gadge Baba Amravati University

**आव्हान 2024 : राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिर : कु. रिया जाधव आणि कु. श्रवण विश्वासराव**

१५. **स्वच्छता हि सेवा** : १२ मार्च २०२५ ओझर, लांजा येथे नगरपंचायत लांजा







वर्षभरातील विविध उपक्रम आयोजित करीत असताना संस्थेचे सर्व सन्माननीय संचालक, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य प्रो.डॉ. सुनिल चव्हाण, उपप्राचार्य डॉ. काशिनाथ चव्हाण तसेच मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे ओएसडी प्रा. सुशील शिंदे, कार्यक्रमाधिकारी श्री. रमेश देवकर या सर्वांचे आणि आमच्या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि प्राध्यापकेतर कर्मचारी व स्वयंसेवकांचे अनमोल सहकार्य लाभले.

डॉ.राहुल मराठे , डॉ.महादेव बडगे , प्रा.अवंतिका केळुसकर

**कार्यक्रम अधिकारी**